# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः 21.11.2024** **वारःगुरुवार**

---

**ठळक बातम्या**

1 ) महाराष्ट्र, झारखंड विधानसभा तसंच नांदेड लोकसभा पोटनिवडणूक आणि 4 राज्यातील 15 विधानसभा जागांच्या पोटनिवडणुकीसाठी मतदान पूर्ण

2 ) राष्ट्रीय सार्वजनिक प्रसारणामध्ये अग्रेसर असलेल्या प्रसार भारतीची WAVES ही नवी OTT सेवा सुरू

3 ) प्रतिरोधक संसर्गासाठी असलेल्या नॅफिथ्रोमायसिन (Nafithromycin) या पहिल्या स्वदेशी प्रतिजैविक औषधाचं अनावरण

4 ) भारत आणि गयाना यांच्यात सहकार्य वाढवण्यासाठी दहा करारांवर स्वाक्षरी

आणि

5 ) महिला आशियाई चँपियन्स चषक हॉकी स्पर्धेत चीनचा पराभव करत भारताचा विक्रमी विजय

**मतदान**

गेल्या 22 ऑक्टोबर रोजी सुरू झालेली राज्यातल्या सार्वत्रिक विधानसभा निवडणुकीच्या मतदानाची प्रक्रिया काल पूर्ण झाली. 288 मतदारसंघात एकंदर 4136 उमेदवारांनी ही निवडणूक लढवली. यामध्ये पक्षांची संख्या जवळपास राजकीय पक्षांच्या उमेदवारांइतकीच होती. राज्यात सर्वत्र शांततेत मतदान पार पडल्याचं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे. संध्याकाळी सहा वाजेपर्यंत सरासरी 65 पूर्णांक 11 शतांश टक्के मतदान झाल्याची नोंद आहे.

राज्यात सर्वाधिक 76 पूर्णांक 25 टक्के मतदानाची नोंद कोल्हापूर जिल्ह्यात झाली. तर सर्वात कमी 52 पूर्णांक 7 दशांश टक्के मतदानाची नोंद मुंबई शहरात झाली.

नांदेड लोकसभा मतदारसंघातल्या पोटनिवडणुकीसाठी काल 62.89 टक्के मतदान झालं. झारखंडमध्ये काल दुसऱ्या टप्प्यातील मतदानात 68.45 टक्के मतदान झालं . इथे नाला मतदारसंघातून सर्वाधिक ऐंशी टक्क्यांहून अधिक मतदान झालं . केरळमध्ये पलक्कड विधानसभा जागेसाठी काल झालेल्या पोटनिवडणुकीत 70.51 टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. मतमोजणी शनिवारी 23 तारखेला होणार आहे

**प्रसारभारती**
राष्ट्रीय सार्वजनिक प्रसारणामध्ये अग्रेसर असलेल्या प्रसार भारतीने WAVES ही नवी OTT सेवा सुरू केली आहे. गोव्यातील 55 व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या उद्घाटन समारंभात या सेवेचं  अनावरण करण्यात आलं . WAVES या आधुनिक डिजिटल स्ट्रीमिंग सेवेच्या माध्यमातून पूर्वी प्रसारित झालेले रामायण, महाभारत, शक्तीमान आणि हमलोग  या सारखे लोकप्रिय  कार्यक्रम पाहता येणार आहेत.   अन्य OTT वाहिन्यांच्या तुलनेत WAVES स्वच्छ आणि कौटुंबिक मनोरंजन करणारी अद्वितीय सेवा असल्याचं प्रसार भारतीचे अध्यक्ष नवनीत कुमार सहगल यांनी सांगितलं. वेव्स च्या माध्यमातून आकाशवाणी आणि दूरदर्शन वरील लोकप्रिय कार्यक्रमांचा आनंद घेता येणार आहे.

**नाफिथ्रोमायसिन**
प्रतिरोधक संसर्गासाठी असलेल्या नॅफिथ्रोमायसिन (Nafithromycin) या  पहिल्या स्वदेशी प्रतिजैविक औषधाचं अनावरण केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉ जितेंद्र सिंग  यांनी काल नवी दिल्ली इथे केलं. जगभरात दरवर्षी 20 लाखांहून अधिक मृत्यूला कारणीभूत असणाऱ्या औषध-प्रतिरोधक असलेल्या  न्यूमोनिया आजाराविरूद्ध, नॅफिथ्रोमाइसिनची तीन दिवसीय उपचार पद्धती उल्लेखनीय ठरेल असं सिंग यांनी यावेळी सांगितलं.
मेड इन इंडिया असलेलं नॅफिथ्रोमायसिन अँटीबायोटिक हे जैवतंत्रज्ञान विभागाच्या  बायोटेक्नॉलॉजी इंडस्ट्री रिसर्च असिस्टन्स कौन्सिलच्या समर्थनाने विकसित करण्यात आलं असून Miqnaf या नावाने ते बाजारात आणण्यात आलं आहे. प्रतिजैविक प्रतिकार-एएमआर चा सामना करणारं हे देशातलं पहिलं स्वदेशी विकसित प्रतिजैविक आहे.

**CBSE**
केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ CBSE बोर्डाच्या इयत्ता 10वी आणि 12वीच्या परीक्षा 15 फेब्रुवारी 2025 पासून सुरू होतील असं मंडळानं कळवलं आहे.   10वीच्या परीक्षा 18 मार्च रोजी संपतील तर 12वीच्या परीक्षा 4 एप्रिल रोजी संपणार आहेत.

**मोदी**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांचे डोमिनिकन समकक्ष रुझवेल्ट स्केरिट यांची काल रात्री गयाना इथे झालेल्या दुसऱ्या भारत-कॅरिकॉम शिखर परिषदे दरम्यान  भेट घेतली. डॉमिनिकाचा सर्वोच्च पुरस्कार मिळाल्याबद्दल मोदींनी त्यांचे आभार मानले. हवामान, आरोग्यसेवा, क्षमतावाढ आणि संबंध मजबूत करणे तसंच संयुक्त राष्ट्रांमधल्या सहकार्यावर यावेळी चर्चा करण्यात आली.या निमित्ताने सुरीनामचे अध्यक्ष चंद्रिकापरसाद चान संतोखी यांचीही मोदींनी भेट घेतली. उभय नेत्यांनी भारत-सूरीनाम

भागीदारीच्या प्रगतीचा आढावा घेतला आणि आर्थिक सहकार्य मजबूत करण्यावर भर दिला. संरक्षण आणि सुरक्षा, व्यापार आणि वाणिज्य, कृषी, UPI, ICT, आरोग्यसेवा, पारंपारिक औषध आणि औषध निर्माण, क्षमता आणि मानव संसाधन विकास, सांस्कृतिक आणि लोकांच्या सहभागासह डिजिटल उपक्रम; या बरोबरच; अन्य क्षेत्रांमध्ये द्विपक्षीय सहकार्य वाढविण्याकरता त्यांनी सहमती दर्शवली.त्रिनिदाद आणि टोबॅगोचे पंतप्रधान डॉ. किथ रॉली यांचीही पंतप्रधानांनी भेट घेतली. आणि भारताची UPI सेवा स्वीकारल्याबद्दल डॉ. रॉली यांचं  पंतप्रधानांनी अभिनंदन केलं. डिजिटल परिवर्तन, आरोग्य, संरक्षण आणि सागरी सुरक्षा, वाहतूक आणि सांस्कृतिक देवाणघेवाण या क्षेत्रांमध्ये भारत - त्रिनिदाद आणि टोबॅगो संबंध मजबूत करण्यावर यावेळी चर्चा झाली. बहामासचे समकक्ष फिलिप ब्रेव्ह डेव्हिस यांच्या भेटीदरम्यान आर्थिक संबंध मजबूत करणे, हवामान बदलावर कार्यवाही आणि हरित भागीदारी यावर चर्चा झाली. मोदी आणि बार्बाडोसचे त्यांचे समकक्ष मिया अमोर मोटली यांनी आरोग्य आणि औषध निर्माण तसंच संयुक्त राष्ट्रांमध्ये सहकार्यासह अनेक महत्त्वाच्या क्षेत्रातल्या सहकार्याचा आढावा घेत भारत-बार्बाडोस संबंध मजबूत करण्याला दुजोरा दिला. बार्बाडोसच्या पंतप्रधानांनी कोविड संकटकाळात भारतानं बार्बाडोसला मदत केल्याबद्दल तसंच भारत-बार्बाडोस संबंधांच्या वचनबद्धतेची दखल घेत  30 नोव्हेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना  ऑनररी ऑर्डर ऑफ फ्रीडम ऑफ बार्बाडोस पुरस्कार प्रदान करण्यामचं जाहीर केलं . दुसऱ्या भारत-कॅरिकॉम शिखर परिषदेदरम्यान  पंतप्रधानांनी त्यांचे ग्रेनेडियन समकक्ष डिकॉन मिशेल यांचीही भेट घेतली. आणि 2 रं भारत-कॅरिकॉम शिखर संमेलन यशस्वीपणे आयोजित केल्याबद्दलत्यांचं अभिनंदन केलं . शिक्षण, आयसीटी, आरोग्यसेवा, अन्न सुरक्षा, क्रिकेट, क्षमता बांधणी आणि शाश्वत विकास या क्षेत्रातील विकास सहकार्यावर चर्चा झाली.

मोदी यांनी अँटिग्वा आणि बार्बुडाचे पंतप्रधान गॅस्टन ब्राउन यांच्याशीही  चर्चा केली. व्यापार आणि गुंतवणूक, स्मॉल आयलंड डेव्हलपिंग स्टेट्स आणि हवामान बदल कृती या मुद्द्यांवर विचारांची देवाणघेवाण झाली. ब्राउन यांनी भारताच्या संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या स्थायी सदस्यत्वाला पाठिंबा जाहीर केला. 7 मुद्दे असलेल्या कॅरिकॉम योजनेकरता विविध नेत्यांनी मोदींचे आभार मानले.

**पंतप्रधान-गयाना**

भारत आणि गयाना यांनी आरोग्य, हायड्रोकार्बन, कृषी आणि संबंधित क्षेत्रांसह अनेक क्षेत्रात सहकार्य वाढवण्यासाठी दहा करारांवर स्वाक्षरी केली आहे. वैद्यकीय उत्पादने, जनऔषधी योजना, सांस्कृतिक देवाणघेवाण कार्यक्रम, गयानामध्ये UPI सारखी प्रणाली तैनात करणे आणि प्रसार भारती आणि नॅशनल कम्युनिकेशन नेटवर्क, गयाना यांच्यात प्रसारण क्षेत्रात सहकार्य आणि सहकार्य यावर सामंजस्य करार करण्यात आले.

**हॉकी**

हॉकीमध्ये, काल भारतीय महिला हॉकी संघाने अंतिम सामन्यात चीनचा 1-0 असा पराभव करून सलग दुसऱ्यांदा विजेतेपद पटकावलं. काल बिहारमधल्या  राजगीर हॉकी स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात महिला आशियाई चॅम्पियन्स चषक भारतानं जिंकला  आहे. या 3 विजयांमुळे भारतानं आता दक्षिण कोरियाशी बरोबरी केली आहे. भारताच्या दीपिकाने 31व्या मिनिटाला पेनल्टी कॉर्नरवरून निर्णायक गोल केला आणि स्पर्धेतले सर्वाधिक 11 गोल करत स्पर्धेचा समारोप केला. तिला स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू म्हणून घोषित करण्यात आलं . भारताने यापूर्वी साखळी फेरीत चीनचा 3-0 असा पराभव केला होता.  तत्पूर्वी, काल झालेल्या कांस्यपदकाच्या लढतीत जपानने मलेशियाचा 4-1 असा पराभव करून स्पर्धेत तिसरं  स्थान मिळविलं .महिला आशियाई हॉकी चषक जिंकल्याबद्दल राष्ट्रपति द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड  यांनी भारतीय महिला हॉकी संघाचं  अभिनंदन केलं आहे. स्पर्धेत सर्वाधिक गोल केल्याबद्दल राष्ट्रपतींनी दीपिकाचं  विशेष अभिनंदन केलं असून संघाला भविष्यातील कामगिरीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. हा विजय संघाचं अपवादात्मक कौशल्य, दृढनिश्चय आणि शिस्त दर्शवितो असं उपराष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. दरम्यान राजगीर, बिहार इथे महिला आशियाई चॅम्पियन्स चषक 2024 च्या यशस्वी आयोजनामुळे युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाने 2025 मध्ये होणाऱ्या खेलो इंडिया युवा स्पर्धा बिहारमध्ये आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल, नमस्कार**